# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### राज्यातील ऊस तोडणी कामगार यांना भविष्य निर्वाह निधी तसेच विमा संरक्षण मिळणेबाबत

**(१) ३८२२ (२३-१२-२०१४). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊस तोडणी कामगार यांना भविष्य निर्वाह निधी तसेच कामगार काम करत असताना अपघात झाल्यास विमा सरंक्षणाचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या वर्षीचा हंगामात किती ऊस तोडणी कामगारांचा विमा उतरविला आहे, तसेच किती कामगारांना ऊस अपघातात विमा संरक्षण मिळाले आहे,

(३) असल्यास, ऊस तोडणी कामगारांना भविष्य निर्वाह निधी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-१०-२०१७) :** (१) ऊस तोड कामगारांसाठी मंडळ स्थापन करण्याची कार्यवाही कामगार विभागामार्फत करण्यात येत आहे. सदर मंडळ स्थापन करुन मंडळासाठी योजना कार्यान्वित केल्यानंतर सदरहू मंडळात नोंदित होणाऱ्या मुख्य मालकांकडून लेव्ही स्वरुपात प्राप्त होणाऱ्या निधीतून ऊस तोडणी कामगारांसाठी भविष्य निर्वाह निधी, उपदान, सानुग्रह अनुदान इत्यादी लाभ देण्यात येतील. सदरची कार्यवाही मंडळ नियमितपणे सुरु झाल्यानंतर अस्तित्वात येणार आहे.

विमा योजनाबाबत डॉ.विठ्ठलराव विखे पाटील ऊस तोडणी वाहतूक शेतमजूर सुरक्षा विमा योजना कामगार संघटना, साखर संघ व युनायटेड इंडीया इन्शुरन्स कंपनी लि. यांचेशी दि.२०/१०/२०१२ रोजी झालेल्या कराराप्रमाणे सुरु आहे.

(२) सन २०१३-१४ मधील गाळप हंगामात १.८२ लाख मजूरांनी अपघात विमा योजनेत भाग घेतला असून मजूर संख्या १९४८ क्लेम्सना अपघात विमा संरक्षणापोटी रु.२४४.०३ लाख इतके उपलब्ध झाले असून १६ क्लेम पोटी रु.३०.०० लाख रकमेचे क्लेम प्रलंबित आहेत.

(३) ऊस तोड कामगारांसाठी मंडळ स्थापन करण्याची कार्यवाही कामगार विभागामार्फत करण्यात येत आहे. ऊस तोड कामगारांना भविष्य निर्वाह निधी मिळण्याबाबत कार्यवाही मंडळ नियमितपणे सुरु झाल्यानंतर अस्तित्वात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वृध्द नागरिकांच्या अन्नपाण्यासाठी केंद्र शासनाने केलेल्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याबाबत**

**(२) ५७०६ (०९-०४-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वृध्द नागरिकांच्या अन्नपाण्यासाठी केंद्र शासनाने केलेल्या (दि मेंटेनन्स ॲड वेल्फेअर ऑफ पॅरेंटस ॲण्ड सिनिअर सिटीजन ॲक्ट २००७) या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने मत व्यक्त केल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कायदा व नियमांचे स्वरुप काय आहे तसेच महसूल विभागाने कलम ७ नुसार प्रत्येक जिल्ह्याच्या उपविभागासाठी न्यायाधिकरण गठीत करावे असाही निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कायदा व निर्णयाच्या अनुषंगाने करावयाच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-१०-२०१७) :** (१) होय,
(२) व (३) ज्येष्ठ नागरिकांच्या परिपोषण / निर्वाह भत्यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर प्रत्येक विभागासाठी न्यायाधिकरण स्थापन करण्यात आले असून त्यामध्ये पीठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी (महसूल) यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तसेच जिल्ह्यांचे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांना निर्वाह अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ज्येष्ठ नागरिक धोरणाची माहिती सर्वसामान्य लोकापर्यंत पोहचवण्यासाठी विविध वर्तमानपत्रामध्ये व बस स्थानकांवर जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

---

**महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरीक अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगत असल्याबाबत**

**(३) १०४८१ (०९-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील १ कोटी १० लाख ज्येष्ठ नागरीक अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगत असुन त्यांच्या मानवी अधिकारांचे हनन होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-१०-२०१७) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) शासनामार्फत ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. भाड्यात सवलत मिळण्यासाठी देण्यात येणारे ओळखपत्र, ६० वर्षे वयावरील ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र, सर्वसाधारण वृध्दाश्रम, शासकीय रुग्णालयातून ज्येष्ठ नागरिकांना विनाशुल्क सेवा देणे, मातोश्री वृध्दाश्रम, ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. भाड्यात ५०% सवलत, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी निराधार व भूमिहीन शेतमजूर महिला अनुदान योजना, ज्येष्ठ नागरिकांच्या मनोरंजन व विरंगुळ्यासाठी योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी विधी सेवा व वृध्द कलावंताना मानधन या योजना राबविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ज्येष्ठ नागरीक ओळखपत्र होलोग्राम बनविण्याबाबत**

**(४) १०४९६ (०९-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ज्येष्ठ नागरीक ओळखपत्र होलोग्राम बनविण्याबाबत शासनाने डिग्निटी फॉउंडेशन यांना एकाधिकार दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २२ ऑगस्ट, २०१४ रोजी संत गाडगेबाबा बहुउद्देशिय ग्रामिण विकास संस्था, बोरगाव, (जि.अमरावती) यांना ओळखपत्र होलोग्राम बनविण्यास रितसर परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, होलोग्राम बनविणाऱ्या कंपनीने गाडगेबाबा संस्थेला होलोग्राम बनविण्यास परवानगी न देण्याची कारणे काय आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-१०-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३), (४) व (५) याबाबत संबंधितांकडून माहिती मागविण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अहवाल प्राप्त झाल्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

---

**राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी योजना जाहीर केल्याबाबत**

**(५) ११३५३ (०९-०४-२०१५). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ रोजी ज्येष्ठ नागरीक योजना जाहीर केली आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत कोणत्या बाबींचा समावेश केला आहे,

(३) तसेच सदर योजनेची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सामाजिक न्याय विभागामार्फत ज्येष्ठ नागरिकांकरिता सर्वसाधारण वृध्दाश्रम, मातोश्री वृध्दाश्रम, ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देणे, ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. भाड्यात ५०% सवलत, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना या योजना राबविण्यात येतात.

(३) सदर योजना विविध विभाग / कार्यालयाकडून कार्यान्वित आहेत.

---

**राज्यात ६५ वर्षाच्या आतील व्यक्तीस जेष्ठ नागरीकांचे ओळखपत्र न देण्याचा नियमाबाबत**

**(६) १२८३८ (०७-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने ६५ वर्षाच्या वरील व्यक्तीस जेष्ठ नागरीकांचे ओळखपत्र देण्याचा नियम असला तरी पूलाची शिरोली (जि.कोल्हापूर) येथे केवळ २०० रुपयांत ५० वर्षावरील व्यक्तीला जेष्ठ नागरीकांचे ओळखपत्र देण्यात येत असल्याचा प्रकार दिनांक ७ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत तक्रार दाखल केली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत किती जणांवर कोणत्या कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत,

(४) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-१०-२०१७) :** (१) नाही.

(२) स्थानिक पोलीस यांचेकडे याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खरीप हंगामात पिकांची आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या टंचाईसदृश्य गावातील पीक कर्जाचे रुपांतर दिर्घ मुदतीत करुन थकीत पीक कर्जाच्या वसूलीस स्थगिती देण्याच्या निर्णयाबाबत**

**(७) १६२६० (१६-०७-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपुऱ्या पावसामुळे राज्यातील खरीप हंगामात पिकांची आणेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या टंचाईसदृश्य २३८११ गावातील पीक कर्जाचे रुपांतर दिर्घ मुदतीत करण्याचे तसेच थकीत पीक कर्जाच्या वसुलीलाही स्थगिती देण्याचा निर्णय दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडकयात स्वरुप काय,

(३) त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व त्याची अंमलबजावणी किती कालावधीत होणार आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सन २०१४ मध्ये राज्यातील काही भागात पडलेल्या अपुऱ्या पावसामुळे राज्यातील ज्या क्षेत्रात पीकांची हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आढळून आली त्या विभागामध्ये जिल्हाधिकारी यांचेमार्फत खरीप पिकांची अंतिम पैसेवारी जाहीर करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या अंतिम पैसेवारी प्रमाणे राज्यातील सहा महसूली विभागात २६ जिल्हयांमध्ये एकूण २३८११ गावामध्ये शासन निर्णयान्वये टंचाई परीस्थिती जाहीर करुन सहकार विभागाशी संबंधित पुढील सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. १) पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जामध्ये रुपांतरण, २) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.

(३) उक्त शासन निर्णयानुसार सात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी १२३०६० शेतकऱ्यांचे रु.७९०.८६ कोटी व व्यापारी बँकांनी ४१०६८१ शेतकऱ्यांकडील रु.२७१२.३४ कोटी शेती कर्जाचे मध्यम मुदत कर्जामध्ये रुपांतरण केले आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी केलेल्या रुपांतरणाच्या १५ टक्के शासन हिस्सा रु.११८.६३ कोटीपैकी शासनाने ७६.४५ कोटी रक्कम मंजूर केलेली आहे. तसेच नाबार्ड ६०% हिस्सा रु.४६७.६३ कोटीस शासनाने दिनांक ०४/०८/२०१५ अन्वये हमी दिलेली आहे.

---

**राज्यातील समाजकार्य महाविद्यालये उच्च शिक्षण विभागाला जोडण्याच्या निर्णयाबाबत**

**(८) १८५८५ (३०-०७-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख**

**(मालाड पश्चिम), श्री.हसन मुश्रीफ (कागल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत येणारी व खाजगी संस्थाकडून चालविली जाणारी ५९ समाजकार्य महाविद्यालये (MSW) उच्च शिक्षण विभागास जोडण्याबाबतच्या सामाजिक न्याय विभागाने पाठविलेल्या प्रस्तावास उच्च व तंत्र शिक्षण विभागाने गेल्या २ वर्षापासून अद्यापही मंजूरी दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मध्ये उल्लेखित महाविद्यालयातील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी हे विद्यापीठ अनुदान आयोग व उच्चशिक्षण विभागाकडून मिळणा-या सुविधांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उच्च शिक्षण विभागाच्या अंतर्गत येत असलेल्या बीपीएड आणि एमएड महाविद्यालयांच्या धर्तीवरची सर्व समाजकार्य महाविद्यालये उच्च शिक्षण विभागाकडे वर्ग करण्याबाबत शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर महाविद्यालये उच्च व तंत्रशिक्षण विभागाला जोडण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही कली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-१०-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) कार्यवाही सुरु आहे.

(५) त्या अनुषंगाने समाजकल्याण आयुक्तालयाने सविस्तर माहिती शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांना दिलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मच्छिमार संस्थांच्या वीज अनुदानात वाढ होण्याबाबत

**(९) २७३८० (१०-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ रोजी तत्कालीन मत्स्यव्यवहाय मंत्री महोदयांकडे झालेल्या बैठकीत मच्छिमार संस्थांच्या वीज अनुदानात वाढ होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी मान्य केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत मागणीची पुर्तता अद्यापही होऊ शकली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मच्छिमार संस्थांना वीजेच्या अनुदानात वाढ दिल्यास त्याचा प्रत्यक्ष फायदा मासेमारी करणाऱ्या बांधवांना होणार आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०१७) :** (१) मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक १७.०७.२०१४ रोजी झालेल्या बैठकीत सदरची मागणी करण्यात आलेली होती.
(२), (३) व (४) मा.विद्युत नियामक आयोगाने त्यांचे वीजदर आदेश दिनांक २६.०६.२०१५ अन्वये मत्स्य व्यवसाय व एकीकृत समुद्र खाद्य प्रक्रिया केंद्र यांचा समावेश औद्योगिक या वर्गवारीमध्ये केलेला आहे. त्यामुळे मत्स्यव्यवसायांना दिनांक १ जून, २०१५ पासून औद्योगिक वर्गवारी लागू झालेली आहे. औद्योगिक वर्गवारीचे दर वाणिज्यिक वर्गवारीच्या तुलनेने कमी आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) या तालुक्यात पॉवरलूम व्यवसायासाठी**
**वीजेचे दर कमी करण्याबाबत**

**(१०) ३३१२२ (२३-१२-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) या तालुक्यात पॉवरलूम व्यवसाय मोठ्या प्रमाणात असून या व्यवसायासाठी वाढविण्यात आलेले वीजेचे दर कमी करुन पूर्वीप्रमाणेच सबसिडी मिळावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वित्त व नियोजन मंत्री यांना दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहून निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मा. विद्युत नियामक आयोगाने त्यांचे वीज दर आदेश दिनांक २६.०६.२०१५ व दिनांक ०३.११.२०१६ लागू करताना लघुदाब यंत्रमागधारकांकरिता नवीन वीज वर्गवारी निर्माण केलेली आहे. सदर वर्गवारीचे वीज दर औद्योगिक वर्गवारीच्या तुलनेत कमी आहेत. तसेच २७ एच.पी. पेक्षा कमी विद्युत जोडभार असलेल्या यंत्रमाग ग्राहकांना रु. २.७७/- प्रति युनिट व २७ एच.पी. पेक्षा जास्त जोडभार असलेल्या यंत्रमाग ग्राहकांना रु. ४.२२/- प्रति युनिट इतकी वीजदरात सवलत शासनातर्फे देण्यात येते.

---

### अकोला जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विद्युत खांब वाकल्यामुळे अपघाती परिथिती निर्माण झाल्याबाबत

**(११) ३३८६८ (२३-१२-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील क्षेत्र खोल काळ्या मातीचे असल्याने शेतातील विद्युत खांब उभे करतांना योग्य फौडेशन अभावी, मोठ्या प्रमाणावर विद्युत खांब वाकुन लोंबकळणाऱ्या विद्युत तारांमुळे अपघाती परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वाकलेले विद्युत खांब व विद्युत तारा पुर्ववत दुरुस्ती करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीकडून सतत दुर्लक्ष करण्यात येते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मोडकळीस आलेल्या विद्युत वितरण व्यवस्थेचे सर्वेक्षण सदर यंत्रणेकडून करण्यात आले असता त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०१७) :** (१), (२) व (३) वाकलेले विद्युत पोल, सडलेले लोखंडी विद्युत पोल, लोंबकळलेल्या तारा, इ. मेंटेनन्सची कामे करण्याकरिता अकोला मंडळामध्ये अकोला शहर/ग्रामीण व अकोट विभागाअंतर्गत उपविभाग निहाय निविदा काढून कंत्राटदाराला मेंटेनन्स कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

अकोला मंडळाअंतर्गत सन २०१६-१७ पासून १९२९ वाकलेले पोल सरळ करण्यात आलेले आहेत, ४९९ सडलेले लोखंडी विद्युत पोल बदलविण्यात आलेले आहेत व २९२५ गाळयातील लोंबकळलेल्या तारा सुव्यवस्थित करण्यात आलेल्या आहेत. तसेच उपविभाग निहाय विद्युत प्रणालीचे सक्षमीकरण व बळकटीकरण करण्याकरिता व वितरण जाळयातील उपकरणांच्या देखभाल व दुरुस्ती करण्यासाठीचा प्रस्ताव महावितरणतर्फे तयार करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड येथील महावितरणाच्या भरारी पथकाने रिमोटद्वारे वीज मिटर फेरफार करणाऱ्या टोळीला पकडल्याबाबत

**(१२) ३४४४७ (१८-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील महावितरणाच्या भरारी पथकाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास रिमोटद्वारे वीज मिटर बंद पाडणे, मिटरची गती कमी करणे व मीटरमध्ये रिमोटद्वारे फेरफार करणाऱ्या टोळीला पकडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पकडण्यात आलेल्या टोळीवर कोणत्या कलमान्वये कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०१७) :** (१) व (२) दिनांक १०.०९.२०१५ रोजी नांदेड भरारी पथक व महावितरण पोलीस ठाणे, लातूर यांनी संयुक्तरित्या सापळा रचून रिमोट विकणाऱ्या इसमास नांदेडमधील चिखलवाडी भागातून रंगेहात पकडण्यात आले. सदर इसमावर व त्याच्या दोन साथीदारांवर भारतीय विद्युत कायदा, २००३ मधील कलम १३८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कंधार तालुक्यातील (जि.नांदेड) येथे दहिकळंबा येथे विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा लोंबकळत असल्याबाबत

**(१३) ३४५७८ (२३-१२-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कंधार तालुक्यातील (जि.नांदेड) येथे दहिकळंबा येथे विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा लोंबकळल्या असल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील लोंबकळलेल्या तारा दुरुस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०१७) :** (१) व (२) मौ. दहिकळंबा येथे विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा लोंबकळत असल्याचे संबंधित शाखा अभियंताच्या निदर्शनास आल्यानंतर सदर तारा व पोल सुस्थितीत करुन दि. २९.०९.२०१५ रोजी वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नांदेड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या व्यसनमुक्ती प्रचार कार्य योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१४) ३४६९२ (१६-०१-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषदेचे समाजकल्याण अधिकारी सुनिल खमितकर यांनी जिल्हा परिषदेच्या समजाकल्याण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या व्यसनमुक्ती प्रचार कार्य योजनेत २ लाख २५ हजार रुपयांचा अपहार केल्याची तक्रार जिल्हा परिषदेतील लोकप्रतिनिधी श्री.मोहन पाटील टाकळीकर यांनी राज्याच्या अतिरिक्त आयुक्तांकडे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिरिक्त आयुक्तांनी दिनांक ८ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास याबाबतच्या चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यांसदर्भात चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-१०-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय, याबाबत चौकशी अहवाल आयुक्त, समाजकल्याण यांचेकडे प्राप्त झाला आहे. त्यानंतर फेरचौकशीसाठी गठीत केलेल्या समितीने दिलेल्या अहवालावरून संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी व संबंधित काम पहाणारे विस्तार अधिकारी यांचेकडून सचोटी व कर्तव्य पारायणता राखली नसल्यामुळे त्यांचेकडून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ प्रमाणे उल्लंघन झाल्याचे निर्दशनास आले आहे.
(४) संबंधिताविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कंदाटी (ता.खेड, जि.रत्नागिरी) खोऱ्यातील सतत दुर्लक्षित असणाऱ्या २१ गावांमधील विजेच्या समस्येबाबत**

**(१५) ३४७६७ (२३-१२-२०१५). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कंदाटी (ता.खेड, जि.रत्नागिरी) खोऱ्यातील सतत दूर्लक्ष होत असल्याने २१ गावांमधील नागरिक माहे जून, जुलै व ऑगस्ट, २०१५ पासून आतापर्यंत विजेच्या समस्या असल्यामुळे अंधारात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागासाठी तापोळा ते शिंदी या १०५ कि.मी. अंतरासाठी एकच कर्मचारी पायी प्रवास करुन दुरुस्तीचे काम करत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली काय व चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार सदरहू गावांतील वीज समस्या कायमस्वरुपी सोडविण्यासाठी पुरेसे कर्मचारी नियुक्ती करुन विद्यूत वाहिनीच्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) कांदाटी खोरे हे रत्नागिरी जिल्ह्यात येत नसून सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यात येते. सदर भागाला मेढा उपविभागांतर्गत, तापोळा शाखा कार्यालयातील ३३/२२ के.व्ही. तापोळा उपकेंद्रातून निघणाऱ्या, व ८८ कि.मी. अंतर असणाऱ्या २२ के.व्ही. शिंदी वाहिनीद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो. या भागासाठी तापोळा शाखेकरिता तांत्रिक कर्मचाऱ्यांची एकूण ११ पदे मंजूर असून सद्यस्थितीत महावितरणचे ५ व बाह्यस्त्रोत कर्मचारी ४ असे एकूण ९ कर्मचारी कार्यरत असून या कर्मचाऱ्यांकडून वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याची कामे करुन घेतली जातात. तसेच आणिबाणीच्या प्रसंगी अन्य शाखा कार्यालयातील व ठेकेदाराचे कर्मचारी बोलावून वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याची कामे केली जातात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी तालुक्यातील (जि.परभणी) टाकळी कुंभकर्ण ते शहापूर रस्त्याच्या दुरवस्थेबाबत

**(१६) ३५८३० (२२-१२-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी तालुक्यातील (जि.परभणी) टाकळी कुंभकर्ण ते शहापूर पाच कि.मी. रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाल्यामुळे या रस्त्यावर ये-जा करणारे वाहनधारक आपला जीव मुठीत धरून वाहन चालवत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्यामुळे दररोज अपघात होत असून त्यात जीवित व आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी परिसरातील नागरिकांनी संबंधीत अधिकारी यांचेकडे केली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य: स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-१०-२०१७) :** (१) अंशत खरे आहे.
(२) नाही.
(३) होय.
(४) व (५) प्रश्नांकित टाकळी कुं. ते शहापूर आर्वी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.३४ असून ०/०० ते ५/०० कि.मी. ही लांबी जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आहे. जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ अंतर्गत सदरील रस्त्याचा समावेश करण्याबाबत जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**अनुसुचित जाती जमातीतील अंपंगाकरिता घरकुलाचा लाभ देण्याबाबत**

**(१७) ४६५८४ (२८-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील अनुसुचित जाती समाजातील अपंगाकरिता दारिद्रय रेषेच्या प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात येऊन केवळ उत्पन्नाच्या दाखल्यावर घरकुलाचा लाभ देण्याबाबत राज्य शासनाने निर्गमित केलेल्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी च्या शासन निर्णयानंतर राज्यात सर्व जिल्हयात एकही घरकुलाचा प्रस्ताव आमंत्रित करण्यात आला नाही तसेच त्यासंबंधाने शासनाने आवश्यक ती जनजागृती केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास राज्यात अशी किती प्रकरणे घरकुल अनुदानासाठी प्राप्त झाली आहेत, याबाबत होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) शासन या समाजातील अपंग बांधवाना घरकुल लाभ देण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही करीत आहे,

(४)नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-१०-२०१७) :** (१) नाही.

(२) सद्यस्थितीत राज्यात ९९२ प्रकरणे घरकुल अनुदानासाठी प्राप्त झालेली आहेत.

(३) दि. ३०/९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये रमाई आवास योजनेत केलेल्या सुधारणांनुसार लाभार्थी निवडीमध्ये अनुसूचित जाती संवर्गातील अपंग लाभार्थ्यांना किमान ३% घरकुल देणे बंधनकारक करण्यात आले असून त्याबाबतच्या सूचना वेळोवेळी संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच या योजनेबाबतची माहिती जास्तीत जास्त अपंग लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने संबंधीत कार्यान्वयन यंत्रणेमार्फत प्रचार व प्रसिध्दी करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात परराज्यातून चोरीच्या मार्गाने बनावट दारू आयात होत असल्याबाबत**

**(१८) ५८५२४ (२०-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात परराज्यातून मोठ्या प्रमाणात बनावट दारू आयात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकारामुळे लोकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चोरीच्या मार्गाने येणाऱ्या बनावट दारूमुळे शासनाचा कोट्यवधीचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती चोरीच्या मार्गाने येणाऱ्या बनावट दारूवर बंदी आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-११-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्हयात परराज्यातून बनावट दारू आयात होत असल्याचे कोल्हापूर जिल्हयातील राज्य उत्पादन शुल्क विभागाने नोंदविण्यात आलेल्या गुन्हयांत गोवा व कर्नाटक राज्य निर्मित जप्त केलेल्या मद्यावरून निदर्शनास आले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

अवैधरित्या दारूनिर्मिती, साठवणुक,वाहतूक व विक्री केंद्रे सुरू असल्याचे निदर्शनास आल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांकडून संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात येत आहे.
(४) व (५) कोल्हापूर जिल्हयात गोवा व कर्नाटक राज्यातून अवैधरित्या मद्याची वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर प्रकरणी एप्रिल २०१३ पासून ते जून २०१६ पर्यंत एकूण २१५ गुन्हे नोंदविण्यात आले असून १४६ आरोपींना अटक करून ५३,७०६ ब.लि. बनावट मद्यासह रू. ३, ४२, ४२,०५५/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच मुंबई दारूबंदी कायदा १९४९ मधील कलम ९३ अन्वये राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून १९५ आरोपींवर व पोलीस विभागाकडून ६४७ आरोपींवर कार्यवाही करण्यात आली आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कोल्हापूर जिल्हयाच्या सीमेलगत विविध मार्गावर तात्पुरते सीमा तपासणी नाके उभारून तेथे संशयित वाहनांची तपासणी करण्यात येते. तसेच जिल्हयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या संयुक्त मोहिमा राबवून अवैध दारू निर्मिती, साठवणुक व विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्हयात देशी दारुची दुकाने, परमिट रुम, बिअरबार व अवैध दारु धंद्यावाल्यांकडे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे होत असलेले दुर्लक्ष

**(१९) ६१३७५ (२०-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयात देशी दारुची दुकाने, परमिट रुम, बिअरबार व अवैध दारु धंद्यावाल्यांकडून दरमहा लाच मिळत असल्याने संबंधित विभागाचे अधिकारी ,कर्मचारी कारवाई करण्यास दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवाना नुतनीकरणाच्या रितसर शुल्कानंतरही सही-शिक्क्यासाठी २०-२५ हजार रुपयांची मागणी होत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात होऊ लागल्या आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती उक्त ठिकाणी नियम डावलून देशी दारुची दुकाने, बीअर बार चालवणारे, अवैध दारु धंदेवाल्यांवर तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुही (जि.नागपूर) तालुक्यातील महावितरणच्या कंत्राटी अकुशल मजुरांकडून धोकादायक कामे केली जात असल्याबाबत**

**(२०) ६५७५९ (२७-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुही (जि.नागपूर) तालुक्यातील महावितरण कंपनीची कामे कंत्राटी अकुशल कामगारांकडून धोकादायक परिस्थितीत करवून घेतली जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन विज वाहिनी कृषीपंपाची जोडणी, खांब उभे करणे, विज वाहिन्यांचा देखभालीची कामे, अकुशल कामगारांकडून कंत्राटदार करवून घेत असून कंत्राटदाराकडून मजुरांचा विमा, प्रशिक्षण, आदि बाबी केल्या जात नाहीत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मृत्यूमुखी पडलेल्या मजुरांना अशा परिस्थितीत शासनाकडून अथवा कंत्राटदाराकडून मदत केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती अशा कंत्राटदाराचे परवाने रदद करण्याबाबत तसेच मृत्यूमुखी पडलेल्या मजुरांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-११-२०१७) :** (१), (२), (३) व (४) कुही तालुक्यातील कोणत्याही प्रकारची कंत्राटी तत्वावर वीज वाहिनी दुरुस्तीची कामे अकुशल कामगारांमार्फत करवून घेतली जात नाहीत. सदर तालुक्यात नवीन वीज वाहिनी, कृषीपंपाची जोडणी, खांब उभे करणे व वीज वाहिन्यांच्या देखभालीची कामे करण्यासाठी मंडळ / विभागीय कार्यालयामार्फत निविदा काढण्यात येते. तसेच कंपनीच्या नियमाप्रमाणे अधिकृत विद्युत परवानाधारक कंत्राटदारांना ही कामे दिली जातात. तसेच कंत्राट देताना कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांचा विमा काढणे

बंधनकारक असते व अपघात घडल्यास कंत्राटदाराने मृत्यूमुखी पडलेल्या कामगाराच्या वारसांना नुकसान भरपाई देणे बंधनकारक आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सर्व शिक्षा अभियानातंर्गत नवीन शाळा खोल्यांच्या बांधकामाकरीता बंद करण्यात आलेला निधी पुर्ववत सुरु करणेबाबत**

**(२१) ६६२६८ (२७-०१-२०१७). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शालेय शिक्षण विभागातंर्गत ग्रामीण भागामध्ये सर्व शिक्षा अभियानातंर्गत नवीन शाळांच्या खोल्या बांधणेकरीता शासनाकडून या पुर्वी निधी उपलब्ध करुन दिला जात होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागातंर्गत गामीण भागामध्ये सर्व शिक्षा अभियानातंर्गत नवीन शाळांच्या खोल्या बांधणेकरीता शासनाकडून निधी देणे बंद केल्याने ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास शासनाने प्राथमिक तसेच माध्यमिक शाळांच्या नवीन शाळा खोल्या बांधणे तसेच शाळा खोल्यांची दुरुस्ती करणेकरीता जिल्हा वार्षिक आराखड्यातून निधी वितरीत करणेबाबतचा शासन निर्णय पारित केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा वार्षिक आराखड्यामध्ये प्राथमिक तसेच माध्यमिक शाळांच्या नवीन खोल्या बांधणे तसेच शाळा खोल्यांची दुरुस्ती करणेकरीता निधीची कमतरता असल्याने शासनाने सदरच्या नवीन शाळा खोली बांधकामाकरीता सर्व शिक्षा अभियानातंर्गत बंद करण्यात आलेला निधी पुर्ववत सुरु करावा अशी मागणी शासनाकडे केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-११-२०१७) :** (१) व (२) सर्व शिक्षा अभियानांतर्गत नवीन शाळांच्या खोल्या बांधण्याकरिता निधी देणे बंद करण्यात आलेले नाही.
(३) दिनांक १८/१०/२०१६ चा शासन निर्णय जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जिल्हा परिषद/ शासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळांचे इमारत बांधकाम/ विशेष दुरूस्तीसाठी जिल्हा परिषदेला देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनाबाबत आहे.
(४) नवीन शाळा खोली बांधकामाकरिता सर्व शिक्षा अंतर्गत देण्यात येत असलेला निधी बंद करण्यात आलेला नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समाज कल्याण विभागाची चंद्रपूर जिल्हयातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती सन २०१५-१६ पासून प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) ६८७१७ (२७-०१-२०१७). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाज कल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे ७१५८ मंजूर अर्ज चंद्रपूर जिल्हयातील विविध महाविद्यालयांकडे प्रलंबित असल्याची बाब माहे ऑगस्टच्या अखेरीस निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, शिक्षणिक वर्ष २०१५-२०१६ मध्ये चंद्रपूर जिल्हयात एकूण ५९०२९ अर्जांपैकी ४९१४१ अर्ज मंजूर करण्यात आले त्यापैकी ७१५८ मंजूर अर्ज महाविद्यालयांकडे प्रलंबित असून त्यांनी ते समाज कल्याण विभागाकडे जमा केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाविद्यालयांकडे शिष्यवृत्तीचे मंजूर अर्ज प्रलंबित ठेवल्या प्रकरणी दोषी कर्मचारी व संबंधित महाविद्यालयावर काय कारवाई केली वा करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची करणो कारणे ?

**श्री. राजकुमार बडोले (३१-१०-२०१७) :** (१) अंशतः होय.

(२) व (३) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये चंद्रपूर जिल्हयात शिष्यवृत्तीचे नोंदणीकृत अर्ज एकूण ५४४४९ इतके होते, त्यापैकी ५२१७८ इतक्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. उर्वरीत १५८१ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयाकडुन प्राप्त झालेले नाहीत. विद्यार्थ्यांचे सदरील अर्ज त्वरेने निकाली काढण्याबाबत संबंधित महाविद्यालयांना आयुक्तालयामार्फत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगरमधील गतीमंदासाठी सुरू करण्यात आलेल्या विकास मतीमंद विद्यालयास दीड वर्षापूर्वी मंजुर झालेले अनुदान मिळत नसल्याबाबत**

**(२३) ६९६३८ (२७-०१-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगरमधील सन २००० मध्ये गतीमंदासाठी सुरू करण्यात आलेल्या विकास मतीमंद विद्यालयास दीड वर्षापूर्वी मंजुर झालेले अनुदान कर्मचाऱ्यांना मिळत नसल्याने सदर विद्यालयातील कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याची बाब दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सामजिक बांधिलकी जोपासत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तातडीने न्याय देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-११-२०१७) :** (१), (२) व (३) खाजगी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या “अ” श्रेणीतील १२३ विना अनुदान तत्वावरील अपंगांच्या विशेष निवासी/अनिवासी शाळांना व कार्यशाळांना अटी व शर्तींच्या अधीनतेने अनुदान तत्वावर मंजूरी देण्याचा शासन निर्णय दिनांक ८ एप्रिल,२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. उक्त शासन निर्णयामध्ये प्रश्नाधिन शाळेचा समावेश आहे. शासन निर्णयातील तरतुदींनुसार वरील शाळांची तपासणी व पडताळणी करुन आयुक्त, अपंग कल्याण यांच्याकडून अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**मराठवाड्यात वित्त्तीय संस्थांनी पीक कर्ज वाटप केले नसल्याबाबत**

**(२४) ७१२०८ (२७-०१-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील शेतकरी दोन वर्षापासून दुष्काळाच्या सावटाखाली असताना वित्त्तीय संस्थांनी अद्यापी पीक कर्ज वाटप केले नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार शेतकऱ्यांना तात्काळ पीक कर्ज वाटप करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८/४/२०१६ रोजी राज्यस्तरीय खरीप आढावा बैठकीमध्ये सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी आणि कृषी व सहकार विभागातील क्षेत्रिय अधिकारी यांना तसेच मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.११/५/२०१६ रोजी राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीमध्ये राज्यातील सर्व बँकांना (सार्वजनिक क्षेत्रातील, खाजगी क्षेत्रातील, ग्रामीण बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका) पीक कर्ज वितरण व पीक कर्ज पुनर्गठन करण्याच्या दृष्टीने उचित कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत. वरीलप्रमाणे कार्यवाही झाल्यामुळे सन २०१६-१७ मध्ये मराठवाड्याकरीता रू.१००८७ कोटी खरीप पिक कर्ज लक्षांकापैकी रू.८८५२.३८ कोटीचे पिक कर्ज वाटप १५.३६ लाख शेतकऱ्यांना झाले असून याचे प्रमाण ८८% आहे. तसेच मराठवाडा विभागामध्ये रब्बीकरीता रू.२३५२.७२ कोटी पिक कर्ज वाटपाचा लक्षांक असून बँकांनी दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत २.६१ लाख शेतकऱ्यांना रू.१८८४.९६ कोटीचे पीक कर्ज वाटप करून ८०% लक्षांक पूर्तता केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांचे कर्जावरील नोव्हेंबर आणि डिसेंबर २०१६**
**या दोन महिन्यांचे व्याज माफ करणे बाबत**

**(२५) ७७६१३ (०६-०५-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांचे कर्जावरील नोव्हेंबर आणि डिसेंबर २०१६ या दोन महिन्यांचे शेती कर्जावरील व्याज माफ करण्यात आल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे काय,

(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांनी शेतीच्या विविध कामांसाठी अल्प मुदतीचे कर्ज घेतलेले आहे त्यांना दोन महिन्यांचे व्याज भरावे लागणार नाही व दिर्घ मुदतीचे कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना या व्याज माफीचा फायदा होणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाबार्ड कडून सहकारी बँकांना २० हजार कोटी रुपयाचे कर्ज उपलब्ध करुन दिले जाणार असून सदर कर्ज शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्रातील किती शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ झाला आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) केंद्र शासनाच्या व्याज माफी योजनेचा राज्यातील २३.६६ लाख शेतकऱ्यांना लाभ झाला आहे.

---

**ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथे एम आय डी सी निर्माण करण्याबाबत**

**(२६) ७८५०५ (२४-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथे एम.आय.डी.सी. निर्माण करण्यासाठी अर्थसंकल्प, पावसाळी व हिवाळी २०१६ या अधिवेशनामध्ये कपात सुचनेच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले असता त्यावर लेखी उत्तरामध्ये ब्रम्हपूरी येथे एम.आय.डी.सी.निर्माण करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे असे मा.उद्योग मंत्री महोदयानी लोकप्रतिनिधीस कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रम्हपूरी येथे एम.आय.डी.सी. निर्माण करण्याकरिता उपविभागीय अधिकारी महसूल ब्रम्हपूरी यांच्याकडून उद्योग विभागाने जागेची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ब्रम्हपूरी येथे एम.आय.डी.सी. निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०८-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

तथापि, सन २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कपात सुचना क्रमांक ६१ च्या माध्यमातून, लोकप्रतिनिधीनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तहसिल, ब्रम्हपुरी यांच्याकडून दिनांक २३/०२/२०१६ च्या पत्रान्वये ब्रम्हपुरी येथे कोरडवाहू, एकपिकी आणि निसर्गावर आधारित पडीत खाजगी जमीनीचा व शासकीस जमीनीच्या उपलब्धतेबाबतचा अहवाल मागविण्यात आला असून अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल असे लेखी कळविले आहे.
(२) हे खरे आहे.

ब्रम्हपुरी तालुक्यात एम.आय.डी.सी. निर्माण करण्यासाठी ब्रम्हपुरी शहरालगत सरकारी किंवा कोरडवाहू जागा उपलब्ध नाही. गोसेखुर्द प्रकल्पाचे नहर गेलेले असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर जमीन ओलीताखाली असल्याचा तसेच इतर जमीनी वन विभागाच्या मालकीच्या असल्याचा तहसिलदार ब्रम्हपुरी यांनी अहवाल दिलेला आहे.
(३) तहसिलदार यांचे अहवालानुसार ब्रम्हपुरी शहरालगत एम.आय.डी.सी स्थापन करण्या संबंधात सरकारी अथवा कोरडवाहू जमीन उपलब्ध नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## फुरसुंगी (जि.पुणे) येथील सासवड रस्त्यावरील मंतरवाडी (उरुळी देवाची) ते कात्रज या बाहयवळण मार्गावरील विजेचे खांब व रोहित्र हटविण्याबाबत

**(२७) ७८७९३ (२८-०४-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फुरसुंगी (जि.पुणे) येथील सासवड रस्त्यावरील मंतरवाडी (उरुळी देवाची) ते कात्रज या बाहयवळण मार्गावर अनेक विजेचे खांब असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंतरवाडी ते उंड्रीदरम्यान प्रचंड वाहतूक कोंडी होत असून अपघात होण्याचा धोका असल्यामुळे हे खांब त्वरीत हटविण्याची मागणी नागरीकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त विजेचे खांब, रोहित्र त्वरित हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) यासंदर्भात सहाय्यक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम प्रकल्प, उपविभाग क्र.१, पुणे यांच्याकडून रस्त्यावरील वीजेचे खांब, लघुदाब, उच्चदाब वीज वाहिनी हलविण्याबाबत दि. २१.०१.२०१७ चे पत्र महावितरण कंपनीच्या रास्तापेठ विभागीय कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग व महावितरण कंपनी यांचेकडून संयुक्त पाहणी करुन सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर रक्कमेची सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उपलब्धता झाल्यानंतर रोहित्र व वीजेचे खांब स्थलांतरणाचे काम करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियांतर्गत देवरीचा (जि.गोंदिया) समावेश करून नागरी आदिवासी क्षेत्रातील नगर परिषद /नगर पंचायतींना रक्कम देण्याबाबत**

**(२८) ७९०८९ (२८-०४-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१६ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानातंर्गत देवरीचा (जि.गोंदिया) समावेश करून नागरी आदिवासी क्षेत्रातील नगर परिषद/नगर पंचायतींना मंजूर करण्यात येणाऱ्या प्रकल्पांसाठी स्वहिश्श्याची रक्कम आदिवासी उपयोजनेतून देण्याबाबत मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे दिनांक २१ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बाबतीत शासनस्तरावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१२-१०-२०१७) :** (१) होय.
(२) देवरी (जि.गोंदिया) हे शहर अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट नसून अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट आहे. त्यामुळे देवरी नगर पंचायतीचा नगर विकास विभागाचा दि.९ मार्च,२०१६ च्या शासन निर्णयामध्ये समावेश करता येत नसल्याबाबत मा.मंत्री (आ.वि.) यांच्या सहीने दि.२ डिसेंबर, २०१६ रोजी मा.विधानसभा सदस्य यांना पत्र पाठविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील वीज पुरवठ्यातील अनियमिततेबाबत**

**(२९) ८०११५ (२८-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील सोनई,घोडेगाव चांदा,करजगावसह अनेक गावांमध्ये वीज पुरवठा व्यवस्थितरित्या होत नसल्याने अनेकदा वीजपुरवठा अचानक खंडित होत असतो

तर दिवसा ८ तास व रात्री १० तास अशा विसंगत वेळेस वीज पुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांचे खूप नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या तालुक्यात सौन्दाळा सब स्टेशन अंतर्गत भैंडा येथील मेन लाईनवरील भातुकवार ३३ केव्ही सबस्टेशनकडे वीज वाहतूक करणाऱ्या तारा शेतकऱ्यांच्या शेतात तसेच रस्त्यावर अनेक ठिकाणी लोंबकळत असल्याने शेतकऱ्यांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ बाबत रात्री वीजपुरवठा सुरु करुन शेतकऱ्यांचे जंगली व हिंस्त्र प्राण्यांपासून संरक्षण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच प्रश्न भाग २ बाबत रस्त्यावर अनेक ठिकाणी लोंबकळणाऱ्या तारा दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०१७) :** (१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार कृषी पंपाना दिवसा ८ तास व रात्री १० तास असे चक्राकार पध्दतीने थ्री फेज वीज पुरवठा करण्यात येतो व व इतर वेळेस सिंगल फेज वीज पुरवठा केला जातो. करंजगांव उपकेंद्रामध्ये येणारी मुख्य ३३ के.व्ही. वाहिनी (भोकर लाईन) अतिभारीत असल्यामुळे करंजगाव उपकेंद्रामधील गावठाण व SDT वाहिन्या वगळता ८-८ तासाप्रमाणे चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(२) सदर वाहिनीवर दोन ठिकाणी लुज स्पॅन होते.

(३) सध्या ग्रामीण विभाग, अहमदनगर अंतर्गत सर्व कृषी पंपाना मा. आयोगाने ठरविल्याप्रमाणे दिवसा ८ तास व रात्री १० तास चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा देण्यात येत आहे. तसेच उर्वरित वेळेस सिंगल फेज वीज पुरवठा केला जातो.

(४) दोन ठिकाणचे लूज स्पॅन ओढून तारा पूर्ववत करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील वारंवार होणाऱ्या खंडित वीज पुरवठयाबाबत

**(३०) ८०१७२ (२८-०४-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हा दुर्गम असल्याने व मनुष्यबळ कमी असल्याने या क्षेत्रात वीज पुरवठा वारंवार खंडित होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धानोरा तालुका हा अतिदुर्गम असल्याने व या क्षेत्रात लाइनमनची कमतरता असल्याने वीज पुरवठा वारंवार खंडित होत असतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार होणाऱ्या खंडित वीज पुरवठ्यामुळे येथील व्यावसायिक,नागरिक मोठ्या प्रमाणावर त्रस्त असून या भागात खंडित होणारा वीज पुरवठा कायमस्वरूपी दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०१७) :** (१) व (२) गडचिरोली जिल्हा अति दुर्गम असल्याने व काही भागातील उच्चदाब वाहिनी घनदाट जंगलातून जात असल्यामुळे पावसाळयात झाडांच्या फांद्या वादळामुळे या भागातील वाहिनीवर पडल्यामुळे वीज पुरवठा खंडीत होत असतो व खंडीत झालेला वीज पुरवठा तातडीने पूर्ववत करण्यासाठी उपलब्ध मनुष्य बळाचा वापर करण्यात येतो.

(३) धानोरा तालुक्यातील वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या बोरी ते रांगी ११ के.व्ही.ची १.४० कि.मी. वाहिनी ही ३३/११ के.व्ही. अमिर्झा उपकेंद्रातून प्रस्तावित करण्यात आलेली आहे. सदर वाहिनीचे काम इन्फ्रा-२ योजनेअंतर्गत प्रगतीपथावर आहे.

---

**राज्यातील पॉवरलुम उदयोगांना दक्षिणेतील राज्यातून सुत आयात करावे लागत असल्याबाबत**

**(३१) ८०४२९ (२१-०४-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अस्तित्वात असलेले पॉवरलुम उद्योगाची परिस्थिती अत्यंत बिकट असून राज्यात पॉवरलुम धारकांना आवश्यक त्या प्रमाणात सुतगिरण्या राज्यात नसल्याने पॉवरलुम धारकांना दक्षिणेतील राज्यातून सुत आयात करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव आयात सुतावर विक्रीवर व इतर कर, मालवाहतुक यावर होणाऱ्या खर्चामुळे राज्यात तयार होणारे सुती कपड्यांची किंमत इतर राज्यापेक्षा जास्त असल्याने खुले बाजारात राज्यातील पॉवरलुम धारकांना नुकसान सोसावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०६-१०-२०१७) :** (१) होय, हे अंशतःखरे आहे.

(२) होय, हे अंशतःखरे आहे.

(३) सदर बाब वस्त्रोद्योग विभागाशी संबंधित नसून वित्त विभाग व परिवहन विभाग यांचेशी संबंधित असल्याने याबाबत कार्यवाही करून तसा अहवाल विभागास पाठविण्यात यावा असे त्या विभागांना यापूर्वीच कळविले आहे. तथापि सदरचा अहवाल अद्याप प्रतीक्षाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या अपंग विभागातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३२) ८४०३१ (२१-०४-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या अपंग विभागात कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदामुळे अनेक वेळा अधिकाऱ्यांना मदतनीसाची, शिपायाची कामे करवी लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विभागात मनुष्यबळ कमी असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या विभागाला आवश्यक कर्मचारी वर्ग देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आंतरजातीय विवाह करणा-या जोडप्यांना कायदेशीर संरक्षण देण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याबाबत**

**(३३) ८४८५० (०९-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना कायदेशीर संरक्षण मिळावे यासाठी स्वतंत्र कायदा करण्यासंदर्भात मा.सामाजिक न्यायमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदरचा कायदा लवकरात लवकर अंमलात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-१०-२०१७) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बारामती-उजनी जलाशयातून एमआयडीसीला पाणीपुरवठा करणाऱ्या नव्या जलवाहिनीतून पाणीगळती होत असल्याबाबत**

**(३४) ८५२०३ (१८-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती, उजनी जलाशयातून एमआयडीसीला पाणीपुरवठा करणाऱ्या नव्या जलवाहिनीतून मोठ्या प्रमाणात पाणीगळती होत असल्याने एमआयडीसीचा पाणीपुरवठा बंद झाला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीपुरवठा बंद झाल्याने बारामती एमआयडीसीतील उद्योगाना पुन्हा टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२६-१०-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक २८/०५/२०१७ रोजी रात्री उजनी जलाशयातून एमआयडीसीला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीवरील मौजे पिंपळी, येथील एअर व्हॉल्वच्या झडपेमधून पाणी गळती होत असल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक २९/०५/२०१७ रोजी सकाळी १०.०० वा पंपीग बंद करुन त्वरीत दुरुस्ती करण्यात आली व दिनांक २९/०५/२०१७ रोजी दुपारी २.०० वा पंपीग सुरु करुन पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यातील लाखो सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण आणि तपासणी झाली नसल्याबाबत**

**(३५) ८५५९४ (१८-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील लाखो सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण आणि तपासणी झाली नसल्याची माहिती माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक लाख १६ हजार नोंदणीकृत सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण आणि तपासणी करण्याचे आदेश सहकार विभागातील अधिकाऱ्यांना देण्यात येऊन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,मुंबईतील ४३३४ सहकारी गृहनिर्माण संस्थांनी २०१५-१६ व मागील काही वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल सादर न केल्याने सहकार विभागाने अवसायन नोटीसा दिल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे जुलै, २०१७ पर्यंत किती सहकारी गृहनिर्माण संस्थांनी लेखा परीक्षण अहवाल सादर केला,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-११-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) राज्यातील ५२८१९ संस्थांनी लेखापरीक्षणाकरीता लेखापरीक्षकाची नेमणूक केली आहे. लेखापरीक्षकाची नेमणूक न करणाऱ्या ९८८५८ सरकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठीचे आदेश सहकार विभागातील संबंधित निबंधकांना देण्यात आले आहेत.
(३) मुंबईमध्ये आर्थिक सन २०१५-१६ यावर्षात लेखापरिक्षण होण्यास पात्र असणाऱ्या गृहनिर्माण संस्था २२९२९ आहेत, त्यापैकी माहे मे, २०१७ अखेर १७८८९ संस्थांचे लेखापरिक्षण पूर्ण झाले असून, उर्वरित ५०४० गृहनिर्माण संस्थांचे लेखापरिक्षण झालेले नाही, त्यांना अंतरीम अवसायन नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.
(४) माहे मे, २०१७ अखेर मुंबई विभागातील १७८८९ सहकारी गृहनिर्माण संस्थांचे लेखापरिक्षण पुर्ण झाले असून त्यांचे अहवाल प्राप्त झाले आहेत.
(५) ज्या संस्थांनी लेखापरिक्षकांची नेमणूक, मागील वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षा अहवाल इ.बाबींचे अनुपालन केलेले नाही त्यांचेविरुध्द कलम ७५(५) अन्वये कारवाई करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांना सहकार आयुक्त, पुणे यांनी त्यांच्या दि.२९.१०.२०१६ रोजीच्या पत्रान्वये निदेश दिलेले असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

### आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केंद्रे उभारण्याबाबत

**(३६) ८६६४० (०९-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आय.आय.टी, आय.आय,एम. या संस्थेत प्रवेश मिळण्यासाठी व यूपीएससी स्पर्धा परीक्षांसाठी शासनाने अनुसूचित क्षेत्रामध्ये किती मार्गदर्शन केंद्रे उभारलेली आहेत व त्या केंद्रांमध्ये पूर्णवेळ किती प्राध्यापक काम करीत आहेत,
(२) असल्यास, आतापर्यंत किती आदिवासी विद्यार्थ्यांना याचा लाभ झालेला आहे,
(३) नसल्यास, शासनाने अद्यापपर्यंत अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आय.आय.टी.,आय,आय.एम, आय.ए.एस.इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन केंद्रे न उभारण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, शासनाकडून अशी मार्गदर्शन केंद्र उभारण्यासाठी किती कालावधी लागणार आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-११-२०१७) :** (१) संघ लोकसेवा आयोग / महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यांत येणाऱ्या भारतीय प्रशासकीय सेवा/राज्य प्रशासकीय सेवा स्पर्धा परिक्षांच्या पूर्व तयारीसाठी राज्यातील ८ विद्यापिठे व बार्टी (पुणे) येथे प्रत्येकी २५ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना व यशदा (पुणे) येथे १० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची योजना दिनांक १५.०७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यांत आली आहे. सदर प्रशिक्षण केंद्रांवर कायमस्वरुपी प्राध्यापकांची नियुक्ती केली जात नसून मानधन तत्वावर तज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण दिले जाते.

(२) सदर योजनेंतर्गत अद्याप ८४ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यांत आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्ती वेतनाचे पैसे देण्याबाबत**

**(३७) ८७११६ (१८-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने भूविकास बँक अवसायानात काढत असताना कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्ती वेतनाचे पैसे देण्याबाबत दिनांक २४ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार राज्यातील भूविकास बँकेच्या १५०० कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काचे निवृत्ती वेतन तसेच वेतनाचे ३०० कोटी रुपये मिळाले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांचे वेतन व थकित देणी देण्यासाठी भूविकास बँकेच्या राज्यभरात विविध ठिकाणी असलेल्या ६० मालमत्तांच्या विक्री करणे तसेच शेतकऱ्यांकडील थकित रक्कम माफ करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भूविकास बँकेतील कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) दि.२४.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये "शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीतुन येणारी रक्कम कर्मचाऱ्यांची देणी अदा करण्यासाठी पुरेशी नसल्यास बँकांच्या मालमत्तेच्या विक्रीमधून उपलब्ध होणाऱ्या रकमेतून कार्यरत/ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देय रक्कम अदा करण्यात यावी" असा निर्णय घेतला आहे.

शासनाने भूविकास बँकेच्या ६० मालमत्तांपैकी ४५ मालमत्ता ई-टेंडरद्वारे विक्री करण्यास मान्यता दिलेली आहे.
(४) बँकेच्या कर्जवसुली रकमेतून व मालमत्ता विक्रीमधून उपलब्ध होणाऱ्या निधीतून बँकेचे अवसायकांमार्फत संबंधीत कर्मचाऱ्यांची देणी अदा करण्यात येणार आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासींच्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत**

**(३८) ८७१८९ (०९-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदीवासींच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आदिवासी लोकप्रतिनिधींनी दिनांक ०६ जून, २०१७ रोजी मा.राज्यपाल यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केलेले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी सादर केलेल्या निवेदनातील मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्न भाग(१) मधील प्रकरणी अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०६-११-२०१७) :** (१) राज्यातील आदिवासी समस्यांची सोडवणुक करण्यासाठी आदिवासी लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जून,२०१७ रोजी मा.राज्यपाल यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केलेले होते
(२) व (३) प्राप्त निवेदनातील मागण्यांचे संक्षिप्त स्वरुप खालील प्रमाणे.

१) महाराष्ट्रातील खऱ्या आदिवासींचे मुलभूत हक्कांचे संरक्षण करावे.

२) पेसा कायदा अंतर्गत काढलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी.

३) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांसाठी रोख रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याच्या शासन निर्णयाचा पुनर्विचार करावा.

४) वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करावी.

५) आदिवासी क्षेत्राची पुनर्रचना करुन नवीन आदिवासी जिल्हे व तालुके निर्माण करावेत.

६) आदिवासी समाजातील अतिमागास जमातींना जमिनी खरेदी करुन देण्याची योजना सुरु करावी.

७) कुपोषण टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करावी.

८) कौशल्य विकास कामांचे प्रशिक्षण देवून रोजगारांची संधी उपलब्ध करुन दयावी.

९) आदिवासी भागातील शेतकऱ्यांना वीज बिलात सवलत मिळावी.

१०) आदिवासी मुलींकरीता स्वतंत्र आश्रमशाळा काढणे.

११) आदिवासी प्रकल्पग्रस्त आदिवासींना मोबदला व नोकरी देण्यात यावी.

१२) आदिवासी आरक्षणात वाढ करणे.

१३) अमरावती येथे जिल्हयाच्या ठिकाणी मुला-मुलींसाठी स्वतत्र सुसज्ज वसतीगृह निर्माण करणे.

१४) अमरावती जिल्हा विभागून मेळघाट हा स्वतंत्र जिल्हा निर्माण करणे.

उपरोक्त विषयांबरोबर विविध लोकप्रतिनिधींनी इतर मागण्यांची निवेदने मा.राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाकडुन या विभागास प्राप्त झालेली आहेत. सदर सर्व निवेदनातील मागण्या विविध विषयांबात असल्याने त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यासाठी संबंधित कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

---

### आदिवासी लाभार्थ्यांना शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याबाबत

**(३९) ८७२८३ (०९-०८-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी समुदायासाठी शासनाच्या अनेक योजना राबविण्यात येतात, परंतु त्याची योग्य माहिती लाभार्थ्यांना मिळत नसल्यामुळे आदिवासी समाज या योजनेपासून वंचित राहत असल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण घेऊनसुध्दा आदिवासी समुदायातील संख्येने जास्त असणाऱ्या किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील तरुण उच्चशिक्षित असूनही गावात इंटरनेटची सुविधा नसल्यामुळे ऑनलाइन कोणतीच माहिती त्यांना मिळत नसल्याने लाभार्थी या योजनेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आदिवासी समुदायासाठी असणाऱ्या शासकीय योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळण्याबाबत शासनाने ग्रामपंचायतीद्वारे माहिती पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांना वृत्तपत्रे, चलतचित्र, योजना फलक, योजना माहिती पुस्तिका, भित्ती पत्रके, पोस्टर्स, घडीपुस्तिका, डॉक्युमेंटरी, यशोगाथा फिल्मस् इत्यादी विविध माध्यमातून प्रसिध्दी देण्यात येते. तसेच शिष्यवृत्ती, वसतीगृह प्रवेश या सारख्या योजनांचा लाभ देण्यासाठी ऑनलाईन व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज प्राप्त होतात.

(३) आदिवासी विकास विभागाच्या दि. ०२.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये डिजिटल पध्दतीने बॅनरव्दारे योजनांची प्रसिध्दी करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार पेसा क्षेत्रातील ५६९१ ग्रामपंचायतीच्या कार्यालयाच्या आवारात प्रामुख्याने पेसा कायदा अंमलबजावणीबाबत व इतर महत्वाच्या योजनांसाठी डिजिटल बॅनरव्दारा प्रसिध्दी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकंरजी (जि.कोल्हापूर) येथील यंत्रमागधारकांनी आत्महत्या केल्याबाबत**

**(४०) ८७४०७ (१८-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील शहरात यंत्रमागधारकांची परिस्थिती बिकट असल्याने तसेच उत्पादन खर्च आणि कापडाला मिळणारा अल्पभाव यामध्ये मोठी तफावत असल्याने मागील दोन वर्षापासून वस्त्रोद्योगात मंदी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वस्त्रोद्योग व्यवसाय बंद करणे शक्य नसल्यामुळे तोट्यात यंत्रमाग कारखाने चालवावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यंत्रमाग तोट्यात चालत असल्याने कर्जबाजारी झालेल्या ५ यंत्रमागधारकांनी माहे मे,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यंत्रमागधारकांना मदत करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१७) :** (१) व (२) होय, हे अशंतः खरे आहे.

(३) नाही.

(४) यंत्रमाग तोट्यात चालत असल्याने कर्जबाजारी झालेल्या ५ यंत्रमागधारकांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आत्महत्या केल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि यंत्रमाग धारकांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून खालील योजना राबविण्यात येतात.

१) साध्या यंत्रमागधारकांसाठी केंद्र पुरस्कृत Pilot Scheme of in-situ Upgradation of Plain powerloom for S.S.I योजनेंतर्गत यंत्रमागधारकास केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात आल्यानंतर राज्य शासनामार्फत प्रतीमाग ३३.३३ टक्के अथवा रु.१०,००० यापैकी जी

रक्कम कमी असेल ती प्रत्येक यंत्रमागधारकास अधिकतम अर्थसहाय्य रु.८०,००० इतके देण्यात येते.

२) तसेच राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेंतर्गत यंत्रमाग सहकारी संस्थांना भाग भांडवल व कर्ज वितरीत करण्यात येते.

३) महाराष्ट्र विज नियामक आयोगाच्या आदेशानुसार दिनांक १/११/२०१६ पासून २७ अश्वशक्ती पर्यंत रु.५.५१ प्रती युनिट २७ अश्वशक्ती वरील यंत्रमाग धारकांना रु.६.८५ प्रती युनिट वीज दर आकारण्यात येत आहे. त्यात राज्यशासन अनुक्रमे २.८५ व र. ४.१९ प्रती युनिट वीज दर सवलत देत असून यंत्रमाग धारकांना रु.२.६६ प्रती युनिट दराने विज पुरवठा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शहापूर (जि.ठाणे) येथील “शबरी” घरकुल योजनेचे काम निधीअभावी बंद असल्याबाबत

**(४१) ८७४६५ (०९-०८-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथे कार्यान्वित असलेली “शबरी” घरकुल योजना निधीअभावी बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर योजना कार्यान्वित होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील साखर कारखान्याच्या कर्जाचे पुनर्गठण करण्याचा निर्णय

**(४२) ८७७८७ (१८-०८-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखान्याच्या कर्जाचे पुनर्गठण करण्याचा निर्णय दिनांक ९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-११-२०१७) :** (१) व (२) होय, खरे आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली साखर उद्योगाच्या प्रश्नांबाबत दि.९.४.२०१७ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे संपन्न झालेल्या बैठकीत राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय दि.२४.७.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे व दि.१३.९.२०१७ रोजी या समितीची बैठक संपन्न झाली. समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यामध्ये १३२/३३ केव्ही अति उच्चदाब उपकेंद्राची स्थापना करण्याबाबत**

**(४३) ८९१९१ (०९-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील ४ ठिकाणी १३२/३३ केव्ही अति उच्चदाब उपकेंद्राची स्थापना करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०१५ मध्ये केलेल्या मागणीनुसार सदर उपकेंद्रे उभारण्यासाठी मा.उर्जा मंत्री यांनी दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास महापारेषणला निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील प्रलंबित अति उच्चदाब उपकेंद्राची स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महापारेषण व महावितरण कंपनीच्या संयुक्त बैठकीत पाटोदा तालुका येवला येथे अति उच्चदाब उपकेंद्राऐवजी ३३ के.व्ही. वाहिन्यांची पुर्नरचना करण्याची शक्यता पडताळून पहाण्याबाबत महावितरण कंपनीस निर्देश देण्यात आले होते. १३२/३३ के.व्ही. येवला उपकेंद्र येथून नविन ३३ के.व्ही बे काढण्याकरिता जागा उपलब्ध नसल्याने, ३३ के.व्ही.वाहिन्यांची पुनर्रचना करणे तांत्रिकदृष्टया शक्य नसून त्याऐवजी १३२/३३ के.व्ही.पाटोदा उपकेंद्राची उभारणी करणे योग्य होईल असे महावितरण कंपनीने कळविले असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत महापारेषण कंपनीस सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील भूखंड एकत्रित शेतकऱ्यांच्या कंपनीला वाटप केलेला असता अधिकाऱ्यांशी संगनमत करुन दुसऱ्या कंपनीस दिल्याबाबत**

**(४४) ८९२७८ (१८-०८-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील भूखंड क्र. पी.९५ हा भूखंड मे.सदगुरू कृपा कॉमर्स प्लाझा या एकत्रित शेतकऱ्यांच्या कंपनीला वाटप केलेला असताना अधिकाऱ्यांनी संगनमत करून सदर भूखंडातील क्षेत्र कमी करून मे.मॉडर्न कॅफे हॉटेल प्रा.ली.या कंपनीस देण्यात येत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती याप्रकरणी दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंजवडी (जि.पुणे) परिसरातील वाहतूक समस्येवर उपाययोजना करणेबाबत

**(४५) ९०३१८ (१८-०८-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे IT हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडी (जि.पुणे) परिसराच्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून बाणेर, बालेवाडी, म्हाळुंगे, माण ते हिंजवडी या पर्यायी मार्गाला ३ वर्षापूर्वी मंजुरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाणेर, बालेवाडी, म्हाळुंगे, हिंजवडी हा परिसर “नो डेव्हलपमेंट झोन” असल्याने रस्त्यासाठी जमीन संपादित करताना संबंधित शेतकऱ्यांना वाढीव एफएसआय अथवा टीडीआर कायद्यानुसार देता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावातील ६ कि.मी. रस्त्याचे १८ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यासाठी ६०० ते ७०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यास राज्य शासनास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याचे भूसंपादन करण्यासाठी आवश्यक असलेला निधी उभारण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०८-११-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

MIDC, DCR मध्ये संपादित शेतजमिनीच्या बदल्यात T.D.R. देण्याची व वापरण्याची तरतूद नाही.

(३) व (४) अशी बाब नाही.

काही शेतकरी FSI व TDR ची मागणी करतात, काही शेतकारी जमीन मोबदल्याची मागणी करतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे जमिन मोबदल्याबाबत एकमत होत नसल्याने अद्याप भूसंपादनासाठी किती निधी लागेल हे निश्चित होत नाही. बाधित शेतकऱ्यांसमवेत बैठका घेवून दर ठरविण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर संपादन महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ नुसार होत असून, अद्याप दर निश्चिती झालेली नाही.
(५) पूर्वीच्या नियोजित रस्त्यामध्ये काही बांधकामे असल्याने रस्त्याचे ठिकाण बदलले आहे. बदललेल्या क्षेत्राची संयुक्त मोजणी करण्यात आलेली असून, बाधित शेतकऱ्यांसमवेत त्यांच्या मागण्या व देय नुकसान भरपाईचे दर ठरविण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्या स्तरावर बैठका घेण्यात येत आहेत.

---

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पअंतर्गत कौशल्य विकास योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४६) ९०४८० (०९-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कौशल्य विकास योजना राबवली जात असून या योजनेतील वॉर्ड बॉय आणि हॉटेल मॅनेजमेंट चे प्रशिक्षण देण्याचे कंत्राट जाणता राजा मल्टीपर्पज चॅरिटेबल ट्रस्टला देण्यात आले असून या संबंधित ट्रस्टने उमेदवारांना अवघ्या २० ते २५ दिवसाचे प्रशिक्षण दिले व त्यानंतर एकाही उमेदवाराला नोकरी लागली नाही परंतू संबंधित ट्रस्टने उमेदवारांना नोकरी लागली असे भासवण्यासाठी रुग्णालय व हॉस्टेलच्या लेटरहेडवर उमेदवारांच्या नावाने बोगस नियुक्ती पत्रे तयार केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बोगस नियुक्तीपत्रे सादर करून जाणता राजा ट्रस्टने आदिवासी विकास विभागाकडून सुमारे २७ लाख ५० हजार रुपयांचे देयक काढले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (३१-१०-२०१७) :** (१), (२), (३) व (४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद यांनी कौशल्य विकास योजनेंतर्गत आदिवासी युवक-युवतींना वार्डबॉयचे प्रशिक्षण व हॉटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देण्याचे काम जाणता राजा मल्टी पर्पज चॅरिटेबल ट्रस्ट, औरंगाबाद यांना दिले होते. सदर प्रशिक्षणात काही गैरप्रकार घडल्याची तक्रार श्री.पंकज साहेबराव संकपाळे यांनी केली आहे. त्यानुषंगाने प्रकरणाची चौकशी करण्याकरिता चौकशी समितीची स्थापना करण्यांत आली असून चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे

---

**साध्या यंत्रमागाचे आधुनिकीकरण करण्याबाबतच्या योजनेत बदल करणेबाबत**

**(४७) ९०९३२ (०९-०८-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साध्या यंत्रमागाचे आधुनिकीकरण करण्याबाबतच्या योजनेत केंद्र सरकारने सुधारीत दिशानिर्देश जाहीर केले असून त्यानुसार राज्यशासनाच्या योजनेत बदल करणेबाबतच्या प्रस्तावावर शासनाची कार्यवाही सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. मंत्री सहकार, पणन व वस्त्रोद्योग यांनी सदर योजना सुरू करण्याबाबत इचलकरंजी येथे दिनांक २७ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या यंत्रमागधारकांच्या मेळाव्यात आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या प्रस्तावावर कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-१०-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) व (४) शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**विटा (जि.सांगली) येथे सहकार न्यायालय स्थापन करणेबाबत**

**(४८) ९१५४४ (१८-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा (जि.सांगली) येथे सहकार न्यायालय सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सहकार मंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३०-१०-२०१७) :** (१) नाही, तथापि, ॲड.विनोद गोपाळ गोसावी यांनी दि.२९/१/ २०१५ रोजी तत्कालिन सहकार मंत्री यांना विटा, जि.सांगली येथे सहकार न्यायालय सुरु होणेबाबत विनंती केली आहे.

(२) शासन निर्णय क्र.राजस १००८/प्र.क्र.५३८/५-स, दि.५/५/ २०११ नुसार नवनिर्मित ८ सहकार न्यायालयांसाठी पदनर्मिती केली आहे. त्यात सांगली जिल्हयातील इस्लामपूर न्यायालयाचा समावेश आहे.

सांगली जिल्हयात सहकार न्यायालय क्र.१ व २ ही सहकार न्यायालये आहेत व त्या २ न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातील इस्लामपूर, कडेगांव, वाळवा,शिराळा, पलूस या तालुक्यातील कार्यक्षेत्रास इस्लामपूर न्यायालय जोडले आहे. त्यामुळे विटा येथे सहकार न्यायालय झाल्यास तेथे फक्त विटा कार्यक्षेत्रातीलच केसेस येतील.

सध्या सहकार न्यायालय क्र.१ सांगली येथे विटाच्या अंदाजे ७५ केसेस आहेत. त्याचप्रमाणे विटा येथील मनमंदीर पतसंस्थेत नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० कलम १०१ नुसार केसेसही चालविल्या जातात.

सध्या सांगली सहकार न्यायालय क्र.१ येथील दाव्यांची संख्या ७२४ व सांगली सहकार न्यायालय क्र. २ येथील दाव्यांची संख्या ९९८ आहे व त्यातील काही केसेस कार्यक्षेत्रानुसार इस्लामपूर सहकार न्यायालयात जातील त्यामुळे विटा येथे सहकार न्यायालय होणे शक्य होणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळात उपप्रादेशिक व्यवस्थापकासह कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४९) ९१७३० (०९-०८-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळात उपप्रादेशिक व्यवस्थापकांसह कर्मचाऱ्यांची मिळून एकूण ७२ पदे रिक्त असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ही रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-११-२०१७) :** (१) होय.

(२) कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती, सेवेचा राजीनामा तसेच नवीन पदभरतीवरील शासनाचे निर्बंध यामुळे सदर पदे रिक्त आहेत.

(३) व (४) आदिवासी विकास महामंडळातील गट- अ व गट- ब मधील रिक्त पदे प्रतिनियुक्तीद्वारे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**धारणी (जि.अमरावती) येथील आदिवासी व अनुदानित आश्रमशाळांना समान धोरणाचा अवलंब करण्याबाबत**

**(५०) ९२६४५ (०९-०८-२०१७). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी (जि.अमरावती) येथील तालुका आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत ४० आश्रमशाळा असून अंदाजे २० अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी समाजाचा विद्यार्थी जर शासकीय आश्रमशाळेत प्रविष्ठ झाला तर दरवर्षी ३६ हजार रुपये जेवण व्यवस्थेवर खर्च शासनाकडून मिळतो आणि त्याच आदिवासी समाजाचा विद्यार्थी जर अनुदानित खाजगी शाळेत प्रविष्ठ झाला तर त्याच विद्यार्थ्याला दरवर्षी फक्त ११ हजार रुपये त्या व्यवस्थेसाठी संस्थांना मिळतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या या दुय्यम धोरणामुळे अनुदानित आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांवर विभागाकडून अन्याय होत असून सदरहू दुय्यम धोरणाचा अवलंब करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, आदिवासी आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळांना समान धोरणाचा अवलंब करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०९-११-२०१७) :** (१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी जि. अमरावती अंतर्गत २७ अनुदानित आश्रमशाळा व २७ शासकिय आश्रमशाळा कार्यरत आहेत.

(२) शासकीय आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांना मोफत भोजन आश्रमशाळेच्या कर्मचाऱ्यांकडून तयार करुन देण्यात येते. विद्यार्थ्यांना भोजनासाठी निधी दिला जात नाही. अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी दरमहा रु. ९००/- प्रतिविद्यार्थी याप्रमाणे १० महिन्यासाठी रु.९०००/- परिरक्षण अनुदान मंजूर करण्यात येते.

(३), (४) व (५) अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांसाठीच्या परिपोषण अनुदानामध्ये वाढ करण्यासाठी शासनाने मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली आहे. सदर समितीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.